# उप वनसंरक्षक, रोहा वनविभाग, रोहा यांचे कार्यालय

दुरध्वनी क्र मु.पो.ता.रोहा, जि.रायगड. दु. क्र.:(०२१९४) २३५७५५ फॅक्स क्र. २३२६५५

Email:- dycfroha@mahaforest.gov.in / dcfroha@gmail.com


पत्र

R.P.A.D.

विषय:- **वनजमिन रायगड.**
मौजे शिरवणे, वाकळघर व कोंडीवली
ता.श्रीवर्धन येथील ३.५४६५ हे. क्षेत्र .
ॲप्रोचरोडसाठी हस्तांतरित करणेबाबत.

जा. क्र.अ/२०/जमिन/ 3434 /२०१६-१७.
रोहा, ४०२ १०९ दि. 11 /०१/२०१७.

प्रति,

श्री.रजनिकांत पाजवानी,
पोओऐ होल्डर, अलतगे स्टोन क्रशींग
इंडिस्ट्रीज, हाऊस नं.१४८, मु.वराठी
पोस्ट व तालुका श्रीवर्धन जि.रायगड.

संदर्भ :- १.आपलेकडील पत्र दि.०१.०६.२०१६.
२.या कार्यालयाचे पत्र क्र.अ/२०/जमिन/१२०९ दि.१३.०७.२०१६
३.आलपेकडील पत्र दि.१४.०९.२०१६
४.वनसर्वेक्षक रोहा यांचेकडील पत्र दि.१९.१०.२०१६

विषयांकित कामी मौजे शिरवणे,वाकळघर व कोंडीवली ता.श्रीवर्धन येथील ३.४१५३ हे. क्षेत्र ॲप्रोचरोडसाठी हस्तांतरित करणेबाबत वन संवर्धन अधिनियम १९८० अंतर्गत प्रस्ताव वरील संदर्भ क्र.०१ आपलेकडून १ प्रतीत या कार्यालयात प्राप्त झालेला आहे. प्रकरणी वरील संदर्भ क्र.०२ अन्वये प्रस्ताव त्रुटी पुर्तता करणेबाबत आपणांकडे परत पाठविण्यात आलेला होता. आपलेकडील वरील संदर्भ क्र.०३ अन्वये त्रुटी पुर्तता करून फेर प्रस्ताव या कार्यालयात सादर करण्यात आलेला होता. तथापी त्यामध्ये परिपुर्ण त्रुटीची पुर्तता करण्यात आलेली नाही. त्यामध्ये खालीलप्रमाणे त्रुटी आढळून येत आहेत.

१. प्रस्तावात केंन्द्रशासनाचे मार्गदर्शक सुचीप्रमाणे चेकलिस्ट सादर केलेली नाही. तरी परिपुर्ण व बिनचूक चेकलिस्ट सादर करावी व चेकलिस्ट मध्ये नमूद केलेल्या सर्व बाबींची पुर्तता करावी.
२. प्रकरणी गट नं. निहाय संबंधित खातेदार यांचे संमतीपत्र सामिल केलेले नाही.
३. प्रकरणी महाराष्ट्र खाजगी वन संपादन अधिनियम १९७५ सुधारित १९७८ चे कलम २२ अ अन्वये पुर्नःस्थापित क्षेत्राचे आदेश समाविष्ट केलेले नाही.
४. प्रकरणी हस्तांतरित होणाऱ्या क्षेत्राच्या मोबदल्यात पर्यायी वनीकरण योजनेसाठी क्षेत्राचा तपशिल खालीलप्रमाणे प्रस्तावात सामिल करणे आवश्यक आहे.
   a) पर्यायी वनीकरणासाठी क्षेत्र लागवडीसाठी योग्य असलेबाबत प्रमाणपत्र.
   b) पर्यायी वनीकरणासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या क्षेत्राच्या KML फाईल
   c) पर्यायी वनीकरणासाठी खर्चाचे अंदाजपत्रक
   d) पर्यायी वनीकरणासाठीचे क्षेत्राचे गांव नकाशा/टोपोशिट/Geo digital map अक्षांश/रेखांशसह
   इ. ८ प्रतीत या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे.
५. प्रस्तावात पान नंबर टाकलेले नाही.

६. FRA-२००६ ची पुर्तता करून प्रस्तावाबरोबर संलग्न करून ग्रामसभेचा नाहरकत दाखला समाविष्ट करणे आवश्यक आहे.

७. रस्त्याबाबत Cross section plan समाविष्ट केलेला नाही.

८. तसेच सर्व कागदपत्रे आंग्ल भाषेत भाषांतरित करणे आवश्यक आहे.

तरी वरीलप्रमाणे त्रुटीची पुर्तता करून फेर प्रस्ताव केंन्द्रशासनाचे मार्गदर्शक सुचीप्रमाणे १ प्रतीत या कार्यालयात सादर करावा.

सोबत :- मुळ प्रस्ताव.

उप वनसंरक्षक
रोहा वनविभाग, रोहा.

D:\Land New as on 18.02.2015\F.C.Act\Aashpura Mining Proposal